दैनिक
www. sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक २२ • Title - Code :- MAHMAR4951 • सोमवार दि.०९ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करण्यासाठी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील बांधावर

## त्वरीत पंचनामे करण्याच्या सुचना

**चंद्रपूर: गत महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात सोयाबीन आणि कपाशीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या शेतमालाची पाहणी करण्यासाठी राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज (दि.८) चिमूर तालुक्यातील वाहनगाव, बोथली, रेंगाबोडी गावांचा दौरा केला. शेतक–यांच्या बांधावर जावून त्यांनी नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.यावेळी महसूल मंत्री विखे पाटील म्हणाले, कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार जिल्ह्यात ६७ हजार हेक्टर पैकी ५५ हजार हेक्टरवर सोयाबीनचे नुकसान झाले आहे. कपाशीलासुध्दा मोठ्या प्रमाणात मार बसला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला तात्काळ नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच पिकांवर खोडकिडीचाही प्रादुर्भाव आढळला असून कृषी शास्त्रज्ञांकडून त्याचे निरीक्षण केले जाईल. पंचनामे पूर्ण होताच राज्य सरकारकडून शेतक–यांना भरीव मदत दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी चिमूर तालुक्यातील वाहनगाव येथील नथ्थुजी रणदिवे यांच्या शेतातील नुकसानग्रस्त सोयाबीनची, बोथली येथील सुधाकर बरडे यांच्या शेतातील कपाशी आणि रेंगाबोडी येथील गजानन ठोंबरे यांच्या शेतातील सोयाबीनची पाहणी केली.**







**महसूल विभागाचा आढावा :**
चिमूर येथील पंचायत समितीच्या सभागृहात आढावा घेतांना ना. विखे पाटील म्हणाले, घरकुल योजनेसाठी लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना जवळचे रेती डेपो उपलब्ध झाले पाहिजे. त्यादृष्टीने महसूल प्रशासनाने नियोजन करावे. विनाकारण वाळूसाठी घरकुलच्या लाभार्थ्यांना आर्थिक भुर्दंड पडायला नको. चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाची नवीन इमारत तसेच चिमूरच्या अपर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी आणि निवासी वसाहतींकरीता निधीमागणीचा प्रस्ताव पाठवावा. भुमी अभिलेख अंतर्गत जमीन मोजणीकरीता ड्रोन ,रोव्हर्स उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे जमिनीची मोजणी गतीने करून द्यावी. अर्ज आल्यानंतर १२ ते १५ दिवसांत संबंधित लाभार्थ्यांची जमीन मोजणी झाली पाहिजे.पाणंद रस्ते हा शासनाचा महत्वाकांक्षी उपक्रम आहे. जास्तीत जास्त लोकांचा पाणंद रस्त्यांचा उपयोग होण्यासाठी जिल्ह्यातील पाणंद रस्ते मोकळे करा. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत चंद्रपूर जिल्ह्यात चांगले काम झाले आहे. तरीसुध्दा पंचायत समिती स्तरावर किंवा मंडळनिहाय कार्यशाळा घेऊन या योजनेची माहिती शेतक–यांपर्यंत पोहचवा. जेणकरून जास्तीत जास्त शेतकरी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होऊ शकतील, अशा सुचना महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. यावेळी वीज पडून बैल मृत्युमुखी पडल्यामुळे रतिराम गायकवाड आणि गणेश देवतळे यांना महसूलमंत्र्यांच्या हस्ते मदतीचा धनादेश देण्यात आला.आमदार किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडीया यांनी घरकुलच्या लाभार्थ्यांना जवळच्या घाटावरून वाळू उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच चिमूर येथे आज संपूर्ण प्रशासन आले आहे. येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुध्दा कार्यान्वित झाले असून लवकरच स्वतंत्र चिमूर जिल्ह्याची निर्मिती करावी, अशीही मागणी त्यांनी केली.

**जिल्हाधिकाऱ्यांनी केले सादरीकरण :**
सादरीकरण करतांना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सांगितले की, जिल्ह्यात ५७ टक्के हेक्टरवर ई –पीक पाहणी प्रयोग झाले असून लवकरच १०० टक्के ई–पीक पाहणी करण्यात येईल. तसेच ई–फेरफार आणि ई– चावडी उपक्रम राबविण्यात येत आहे. गत दोन महिन्यात अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात ६१४३० हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. बाधित झालेल्या शेतक–यांची संख्या ६८ हजार असून यापैकी ५८ हजार शेतक–यांचे पंचनामे पूर्ण करून अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे.जिल्ह्यात ४० पैकी ३८ वाळू घाटांचे लिलाव करण्यात आले आहे. यातून २८ कोटी रुपये महसूल प्राप्त झाला आहे. जिल्ह्यात ३० वाळू डेपोचे नियोजन करण्यात आले आहे. गौण खनीज मधून ६४ टक्के वसूली करण्यात आली असून अवैध उत्खनन व वाहतुकीतून २ कोटी १ लक्ष रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. शासन आपल्या दारी अंतर्गत जिल्ह्यातील ३ लक्ष ८० हजार ९५० लाभार्थ्यांना लाभ आला आहे. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेत गतवर्षीपेक्षा ५०० पट शेतक–यांचा सहभाग वाढला आहे. गतवर्षी या योजनेत ६७ हजार शेतकरी सहभागी झाले होते तर यावर्षी सहभागी शेतक–यांची संख्या ३ लक्ष ५० हजार ९७६ आहे. यातून ३ लक्ष २७ हजार हेक्टर क्षेत्राला संरक्षित विम्याचे कवच प्राप्त झाले असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.बैठकीला महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह खासदार अशोक नेते, आमदार किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडीया, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम. यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# खड्डा चुकविण्याच्या प्रयत्नात दुचाकी सह बाप–लेक पडले नदीपात्रात

## बापाला वाचविण्यात यश ;मुलगा गेला वाहून



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**
अहेरी–चंद्रपूर हा राष्ट्रीय महामार्ग असून या मार्गावर दिवस रात्र मोठ्या प्रमाणात वाहनाची वर्दळ सुरू आहे. अश्यातच गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड येथील लोह प्रकल्पातून लोह खनिजांच्या कच्चा मालाची वाहतूक जड वाहनांने सुरु आहे.
जड वाहतुकीमुळे रस्त्यासह नदी पुलावर अगणित खड्डे पडले असून खड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा हे कळायला मार्ग नाही.या आधी अनेक अपघात या मार्गावर घडले आहेत.अनेकांना जीवास मुकावे लागले. काहींना अपंगत्व आले आहे असे असतानाच दि.(८) रविवारी दुपारच्या सुमारास गोंडपीपरी कडून स्वगावी दुचांकीने येत असताना आष्टि जवळील वैनगंगा नदीपुलावर जड वाहनांच्या गर्दी मुळे खड्डा चुकीविण्याच्या प्रयत्नात दुचाकीस्वाराचा ताबा सुटल्याने दुचाकीसह दोघे जण नदीपात्रात पडले व अन्य एक जण पुलावरील रस्त्यावरच कोसळला. त्यात किशोर गणपती वासेकर हा नदीतील पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. गणपती येराजी वासेकर यास नदीतून बाहेर काढण्यात यश आले.शुभम बोलगडवार हा सुखरूप आहे.

**गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्याची दुभाजक असलेली**
आष्टी जवळील वैनगंगा नदीवरील पूल जीर्ण झाला असुन आहे.जड वाहतुकीमुळे पुलावर खड्डे पडले आहेत. खड्डा चुकीविण्याच्या नादात अपघात घडला.यात चामोर्शी तालुक्यातील एक जण नदीपात्रात वाहून गेला. घटनेची माहिती पोलीसांना कळताच आष्टी सह गोंडपीपरीचे ठाणेदार जीवन राजगुरू घटनास्थळी दाखल झाले.मात्र नदीला पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने सदर इसम वाहून गेल्याचे सांगण्यात येत आहे.

पुलावरील खड्डे जीवघेने ठरत आहे.अनेक अपघात खड्डयांमुळे घडत आहे.बांधकाम विभागाने तात्काळ खड्डे बुजवावे अन्यथा तीव्र आंदोलन करू
**विवेक राणा शहर प्रमुख**
**युवासेना गोंडपिपरी**

# शहिद जवानांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी पोलीस दलाने लाहेरी येथे उभारले शहिद स्मारक

**गडचिरोली । प्रतिनिधी**
गडचिरोली पोलीस मुख्यालयापासून दोनशे किलोमीटर दुर व छत्तीसगड सिमेलगत असलेल्या अतिदुर्गम अशा उपपोस्टे लाहेरी हद्दीमध्ये ०८ ऑक्टोंबर २००९ रोजी माओवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्यामध्ये गडचिरोली पोलीस दलाचे एक पोलीस अधिकारी व १६ जवान शहिद झाले होते. त्यांना श्रद्धांजली म्हणून तसेच त्यांचे महान कार्य व देशासाठी केलेले बलिदान इतर पोलीसांपर्यंत व जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता तसेच त्यांच्या कार्याला सतत आठवणीत ठेवून इतर अधिकारी,जवानांना प्रेरणा देण्याकरीता उपपोस्टे लाहेरी येथे शहिद स्मारक उभारण्यात आले. सदर शौर्यस्थळ व शहिद स्मारकाचा अनावरण सोहळा ०८ ऑक्टोंबर रोज रविवारला श्र पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या हस्ते पार पडला.
सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या हस्ते शौर्य स्थळ व शहिद स्मृती स्मारकाचे रिबीन कापून व दीप प्रज्वलन करुन अनावरण करण्यात आले. त्यानंतर सर्व जमलेल्या मान्यवरांनी शहिद स्मारकास पुष्पगुच्छ अर्पण करुन व दीप प्रज्वलन करुन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी




आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, आम्ही आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांचे स्वागत करत आहोत तसेच जे माओवादी विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास ईच्छुक असतील त्यांना सन्मानाने जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल व माओवाद्यांच्या जाचाला आता घाबरण्याची गरज नसून, गडचिरोली पोलीस दल तुमच्या संरक्षणासाठी व विकासासाठी सदैव तत्पर आहे. तसेच गडचिरोली पोलीस दल आपल्या सर्व अडचणी व समस्यांचे निराकरण करण्यासाठी मदत करेल. यासोबतच प्रभारी अधिकारी लाहेरी व त्यांच्या संपूर्ण टीमने केलेल्या कार्याचे कौतुक केले.या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक नीलोत्पल , अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) शकुमार चिंता , अपर पोलीस अधीक्षक, अहेरी यतिश देशमुख, सीआरपीएफ बटा. ३७ चे कमांडट खोब्रागडे ,उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड नितीन गणापूरे व इतर वरिष्ठ अधिकारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, आश्रम शाळा लाहेरी येथील शिक्षक वृंद व विद्यार्थी, येरकलवार गुरुजी व गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता उपपोस्टे लाहेरीचे प्रभारी अधिकारी संतोष काजळे, पोउपनि. प्रशांत डगवार, पोउपनि. अभिजीत काळे, पोउपनि. सचिन सरकटे व सर्व अंमलदार, सिआरपीएफचे असिस्टंट कमांडट अशोक कुमार ,पोनि. शीतला प्रसाद तसेच एसआरपीएफ ग्रुप ०७ चे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले.

# शिक्षणापासून कोणालाही वंचित ठेवू नका–डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा ।प्रतिनिधी**
शिक्षणापासून कोणलाही वंचित ठेवता येणार नसल्याचे प्रतिपादन विदर्भ प्रदेश अध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे यांनी मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांना पत्र देवून केली आहे. नुकतेच महाराष्ट्र शासनाने २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांना बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे खेडयापाडयातील विद्यार्थ्यांना घातक ठरणार आहे. सर्वांना शिक्षणांचा हक्क या कायद्यानुसार इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एक किलोमीटर तर पाचवी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना तीन किलोमीटरच्या परिसरात शाळा उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे.या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी झाली तर नव्या योजनेमुळे २० कि.मी परिसरातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा बंद होवून एकच शाळा सुरू राहील त्यामुळे कमी वयाच्या बालकांना शाळेत पाठविणे खेडयातील पालकांना त्रासदाहक ठरणार आहे.शासनाने खेडयातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा सुरू ठेवून त्यांतील गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन देवून शैक्षणीक सुविधा पोहचविल्यास नक्कीच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल. तसेच ग्रामीण भागातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यां पर्यंत शिक्षण पोहचविण्याचे प्रयत्न शासनाव्दारे केले पाहिजे. शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये या दिशेने शासनाने कार्य केल्यास देशाचा विकास होईल असे डॉ. आगलावे यांनी पत्रात म्हटले आहे.



# वरोरा येथे विशेष लोक अदालतीमध्ये

## १ कोटी ५४ लक्ष रुपये नुकसान भरपाईची रक्कम अदा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी भीष्म यांच्या निर्देशानुसार तसेच जिल्हा व सत्र न्यायाधीश–१ प्रविण अभंग यांच्या मार्गदर्शनाखाली वरोरा येथील न्यायालयात विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले.
सदर विशेष लोक अदालतीमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर निलेश सरोसिया हे पॅनल प्रमुख होते. सदर पॅनलवर भूसंपादनाची ३८ ,मोटर वाहन अपघात नुकसान भरपाईची २ तर कौटुंबिक वादाची ७ अशी एकूण ४७ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी भूसंपादनाची २७ प्रकरणे यशस्वीरित्या निकाली काढण्यात आली असून



नुकसान भरपाईची १ कोटी ५४ लक्ष ९० हजार ५७८ रुपये रक्कम अदा करण्यात आल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी दिली.

**धावपळीच्या जीवनात पोटाची भूक भागविण्यासाठी अनेकदा उपहारगृहात वा टपरीवर जाऊन नाश्ता करावा लागतो. जो नाश्ता आपण खातो तो शुद्ध आहे का? त्यात अन्नभेसळ तर नाही ना! याची ग्राहक म्हणून खात्री करून घेणे आपले कर्तव्य आहे. आरोग्याशी या खाद्यपदार्थाचा संबंध येत असल्याने सतर्कता हाच त्यावर उपाय आहे. जागृक नागरिक म्हणून आपण काळजी घेतली पाहिजे.**

# अन्नभेसळ




कामानिमित्ताने शहराकडे येणाऱ्यांची गर्दी सर्वत्र वाढली आहे. महत्त्वाच्या कामानिमित्ताने, कधी पर्यटनाच्या निमित्ताने, तर कधी सहज शहरात फेरफटका मारायला बाहेरगावाहून मंडळी शहरांत येतजात असतात. वाढत्या गर्दीतून हॉटेलिंग व्यवसायाला अलीकडे बऱ्यापैकी चांगले दिवस आले दिसतात. वाढत्या गर्दीमुळे हॉटेल व्यवसाय सुरू करण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात उपहारगृहांची गर्दी दिसते. हॉटेलींगमधून रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.भूक लागल्यावर काही ना काही खाणे ही जवळपास सगळ्यांचीच गरज आहे. साधारणतः दशकापूर्वी खेड्यातून येणारी माणसे शहरात येत असताना सोबत शिदोरी घेऊन यायची. त्याचे पहिले कारण म्हणजे त्यांच्याकडे शहरात नाश्ता करण्यासाठी पुरेसे पैसे नसायचे. दुसरे कारण पैसे बचत यासोबतच घरचे जेवण चांगले असते हा पारंपारिकतेने चालत आलेला विचार असावा. त्यामुळे घरून निघताना अनेकांसोबत तिजोरी असायचीच. भूक लागली की शिदोरी सोडून संबंधित आपले उदरभरण करायचे.अलिकडे शहरात येणारा गरीब असो की श्रीमंत जवळपास सगळ्यांकडेच जाण्यायेण्यापुरते आणि नाश्त्यापुरते पैसे असतात. नसेलही तरी उधारवाडी करून ती व्यवस्था केली जाते. जेव्हा काही कामानिमित्ताने व्यक्ती शहरांमध्ये येतो उपहारगृहात काहीना काही खात असतो. शहरात राहणाऱ्या लोकांनासुद्धा अनेकदा घरी नाश्ता बनवायला पुरेसा वेळ नसल्याने हॉटेलमध्ये जाऊन नाश्ता करण्याची सवय असते . घरचे अन्न खाऊन कंटाळल्यामुळे किंवा जेवण बनवण्याचा कंटाळा आला की बाजारातून नाश्ता आणून भूक भागविली जाते. परंतु हॉटेलमध्ये जो नाश्ता करतो तो आरोग्यासाठी हितकर आहे का? शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार बनवला आहे का? याचा विचार करण्यासाठी ग्राहकांकडे वेळ नाही. जे वाढले ते मनात कोणत्याही प्रकारची शंका न घेता खाणे हा धर्म मानून खात असतो. आपल्यापुढे जो पदार्थ वाढला तो खरोखरच खाण्यालायक आहे का? त्यात ताजेपण आहे का? की व्यवहारचातुर्य वापरून त्यातला ताजेपणा भासवला जात आहे याचा ग्राहक विचार करत नाही. दुकानदाराने वाढलेल्या नाश्त्यावर शंका घेण्याची आपल्याकडे तरी सवय नाही. त्यामुळे बऱ्याचदा काही दुकानदार ग्राहकांच्या या भोळेपणाचा गैरफायदा घेत शिळेपाके खाद्यपदार्थ ताजे असल्याचे भासवून ग्राहकांच्या मस्तकी मारतात. अनेकांना त्या संदर्भात काही माहितीही नसते. कारण अन्न हे पूर्णब्रम्ह अशी परंपरा असल्याने खाद्यपदार्थात काही घालमेल असू शकते असा विचारही येत नाही. त्यामुळे समोर जे वाढले ते पवित्र मानून आपण खात असतो. परंतु अलिकडे वर्तमानपत्रातून वाचायला मिळणाऱ्या अन्नभेसळ घटनांच्या बातम्या लक्षात घेता आपण ज्या हॉटेलमध्ये, टपरीवर नाश्ता करणार आहोत त्यांत काही भेसळ तर नाहीना याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. पूर्वी अन्नपदार्थ गावातल्यागावात घरच्याघरीच बनवले जायचे आता तसे नाही. आता अन्नपदार्थ बनविण्यासाठी लागणारे घटक अनेक ठिकाणाहून आणले जातात. उदाहरणार्थ गहू हरियाणाचा, दूध महाराष्ट्रातील कुठल्यातरी गावातले, तांदूळ गडचिरोलीचा, भाजीपाला नागपूरचा असा कामतिघाडा कारभार असतो. एकाच वस्तूसाठी लागणारे विविध घटक विविध भागातून सहजपणे उपलब्ध होत असतात. वाहतुकीच्या सुलभतेमुळे अन्नपदार्थासाठी लागणारे घटकांची आर्यात निर्यात करणे, व्यापार करणे सोपे झालेले आहे. त्यामुळे होणारी संभाव्य भेसळ नाकारता येत नाही. अन्नपदार्थाच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्यासाठी १९५४ मध्ये अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा आला. ५ ऑगस्ट, २०११ पासून अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्याची जागा अन्नसुरक्षा व मानदे कायदा या नवीन कायद्याने घेतली.



यामध्ये संपूर्ण भारतातील अन्नपदार्थावरील नियंत्रणात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कायद्यान्वये आरोग्यास हानिकारक असलेल्या दोषाबाबत व कायद्यातील इतर किरकोळ अटीचे उल्लंघन करणाऱ्या अन्न व्यवसायिकांना भेसळीबाबत व कायद्यातील इतर किरकोळ अटींचे उल्लंघन केल्यास दंड भरून सोडण्याची तरतूद आहे. या नवीन कायद्यानुसार महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त न्याय निर्णयअधिकारी म्हणून काम पाहतात. त्यांना दहा लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्याचे अधिकार असल्याचे सांगितले जाते. आरोग्याला हानिकारक बाबी अन्नपदार्थात आढळल्यास अशा भेसळीबाबत न्यायालयात खटले दाखल करण्याची तरतूदसुद्धा या कायद्यामध्ये असल्याची माहिती आहे. नमुने घेणाऱ्याला अन्नसुरक्षा अधिकारी म्हणून संबोधले जाते. आपल्या आरोग्यासाठीअन्न भेसळीबाबत नागरिकांनी सावध असले पाहिजे. या कायद्याची सक्षमपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. परंतु आयुष्य जगताना माणसाची रोजची धावपळ ,कामाबद्दल व्यस्तता, जागृतीचा अभाव आणि अन्नधान्याच्या ठेकेदाराची चाललेली मक्तेदारी व काही प्रमाणामध्ये प्रशासनाचे असलेले दुर्लक्ष त्यातील भ्रष्टाचार यामुळे हा कायदा पाहिजे त्या प्रमाणामध्ये फारसा सक्रिय नाही. आपले अधिकार काय आहे? हे ग्राहकांना माहिती नसते. आपले कर्तव्य काय आहे? ते दुकानदारांना माहिती नसते. उदाहरणार्थ नाश्ता करायला जात असताना त्या खाद्यपदार्थांमध्ये कोणते तेल वापरले आहे. त्याचे नाव दर्शनीभागामध्ये लिहून ठेवणे आवश्यक आहे. खाद्यपदार्थांमध्ये काही भेसळ होत नाही ना! यासाठी नागरिकांनी सतर्क असणे आवश्यक आहे.

अन्नपदार्थांमध्ये अपायकारक पदार्थ मिसळणे. ( मिठाईमध्ये विषारी रंग मिसळणे). मूळ पदार्थाऐवजी बनावट माल वापरणे (चहा ऐवजी लाकडाचा भुसा रंगवून वापरणे) याप्रकारे कायद्याने ठरवून दिलेल्या पदार्थाऐवजी दुसरा पदार्थ मिसळणे. एखाद्या अन्नपदार्थात सडलेले, कुजलेले, खराब किंवा किडलेले पदार्थ असणे. एखाद्या पदार्थात मर्यादेपेक्षा जास्त अयोग्य रंग मिसळणे. एखाद्या पदार्थात ते जास्त वेळ टिकण्यासाठी मर्यादेपेक्षा जास्त रासायनिक अंश वापरणे. ठरलेल्या गुणवत्तेपेक्षा कमी गुणवत्तेचा पदार्थ विकायला असणे. (शुद्ध तुपाऐवजी तेल वापरणे, दुधातील स्निग्ध पदार्थ काढून घेणे) अशा अनेक बाबीचा उल्लेख या अन्नभेसळ कायद्यामध्ये आहे. नागरिकांचे आरोग्य चांगले असावे यासाठी शासन प्रशासन आपल्यापरीने कार्य करत असतेच .परंतु ग्राहकांना आपले कर्तव्ये आणि अधिकार माहीत नसल्यामुळे अनेकदा ग्राहकांची फसगत होते. अन्नभेसळ होऊ नये याची काळजी घेतली पाहिजे.हॉटेल परिसर स्वच्छ व निटनेटका असायला पाहिजे. हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी स्वच्छ व निटनेटके कपडे वापरले पाहिजे. परंतु अनेक हॉटेलमध्ये स्वच्छता दिसत नाही. हॉटेलमध्ये विकल्या जाणाऱ्या पदार्थांवर माशा बसणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. वजनमापक प्रमाणित आहे का? याची खात्री करून घ्यायला पाहिजे. दुकानातील लायसन्स दर्शनी भागात दिसेल अशा पद्धतीने ठेवले पाहिजे. त्यापुढे दुकान मालकाचे नाव ग्राहकांना वाचता येई असा स्पष्ट बोर्ड दुकानासमोर असायला पाहिजे. अनेक दुकानदार उपहारगृहाची जबाबदारी आपल्या नोकरांवर टाकतात. बरेचदा नोकर निष्काळीपणे सेवा देतात. तेव्हा त्याची तक्रार करण्यासाठी प्रशासनाने प्रत्येक हॉटेलमध्ये दुकानदाराचे पूर्ण नाव, मोबाईल नंबर, दुकानदार ऐकत नसल्यास त्यांच्याविरुद्ध अपील कोणाकडे करायचे त्या कार्यालयाचे नाव व पत्ता, तक्रारनंबर दर्शनीभागात दिसेल असे लावल्यास कारवाईच्या धास्तीने कोणीही दुकानदार अन्नभेसळ करण्याकडे प्रयत्न करणार नाही. या व्यवसायाचे ज्ञान असणाऱ्या प्रशिक्षितांनाच हा व्यवसाय करण्याची परवानगी असायला पाहिजे. यासंदर्भात ग्राहकमंचाने जागृती आणण्याचा प्रयत्न केला तर खवैय्यांना आरोग्याची चिंता भासणार नाही.

# निर्भयतेने लढा देणारा धुरंधर नेता-डॉ.नितीन राऊत

**काही आयुष्यचं आपल्याला आतून साद घालीत येतात. काळोखाच्या वाटा तुडवीत प्रकाशाचा शोध घेणारी ही आयुष्य केवळ त्यांच्यापुरती उरत नाहीत वा केवळ कुटुंबीयांपुरती मर्यादित असत नाहीत, ती समग्र समाजाची होतात. राजकारणाच्या मंचावर अनेक पात्रे येतात आणि आपले ऐतिहासिक कार्ये पार पाडून निवृत्त होतात. परंतू आपल्या गूण कर्तृत्वाच्या योगाने ज्या व्यक्ति जनतेच्या मनात कायमचे घर करतात त्यात एक अविस्मरणीय व्यक्तिमत्व म्हणुन विद्यमान आमदार डॉ. नितीन राऊतांचा उल्लेख करणे महत्वाचे राहिल. आपण केलेल्या विकासकामाच्या नेत्रदिपक यशाने उत्तर नागपूरला भारावून, भांबावून सोडलं आहे. त्याची मोजदाद करता येणार नाही.हत्तीच्या साठमारीत चिरडून मरणाऱ्या सश्यां सारखे गोरगरीब राजकीय नेत्यांच्या संघर्षात भरडले जात आहेत. असे लाचारीचे जीवन नको, स्वाभिमान बाळगा असा कानमंत्र देऊन या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी सर्वसामान्य व गोरगरीबांचा 'टाहो' समाजापर्यंत पोहचविण्याचे काम डॉ. नितीन राऊत सारख्या निढळ छातीच्या व्यक्तिमुळे होत आहे, हे खरोखरंच वाखण्याजोगी बाब आहे. मग ते कोणतेही काम असो तितक्याच आत्मीयतेने, मेहनतीने व जिद्दीने करणारे डॉ. राऊत याचं श्रेय ते वक्तशिरपणा व शिस्तीला देतात.**



राजकारणात हेलकावे खुप असतात, परंतू ज्यांच्या जवळ दुर्दम्य आत्मविश्वास, प्रचंड इच्छा शक्ति आणि जिवापाड मेहनत करण्याची तयारी असते, तीच माणसं ताठ कण्यांनी तग धरुन असतात. त्यात आपला हातखंडा आहे. पाच दशकापूर्वी पासुन आपण अविरत समाजासाठी संघर्षरत आहात. जगण्याला कुठलं तरी तात्विक अधिष्ठान असल्याशिवाय माणुस मोठा होत नाही, मग ते क्षेत्र कुठलेही असो. ते अधिष्ठान हे साऱ्या यशस्वी माणुसपणाचं रहस्य असतं, हे आपण सिध्द करुन दाखविले आहे. आपल्या मतदार संघाबरोबरच राज्याचा विकास हा विचारही महत्वाचा आहे तो आपण करण्याचा भरकस प्रयत्न सुध्दा केला, ही हातोटी फार कमी लोकांना जमते. कारण ती सुक्ष्मवृत्ती आपल्यात सामावली आहे. परिवर्तन हा जीवंत असण्याचा पुरावा होय असे म्हणतात, ते काही खोटे नाही, हेच परिवर्तन आपल्या मतदार क्षेत्रात घडवून आणले आहे. सार्थ अभिमान वाटावा अशा योजना आपल्यात, भुषणावह बाब आहे. हे निर्विवादसत्य आहे. प्रसिध्दीसाठी हा उपदव्याप नाही. खरोखरच दुर्लक्षीत असलेल्या आपल्या मतदारसंघाला उकार व आकार देवून झालर लावलीत जे नव्हतं ते आणलं. कीर्ती आणि प्रसिध्दी मध्ये गल्लत करु नये, प्रसिध्दी मिळते आणि संपते परंतु कीर्ती दिगंतरी कायम राहते ती कीर्ती कायमस्वरुपी मिळवलीत, यात दुमत नाही. महाराष्ट्रातील (विशेषत:) सर्वसामान्य व दलित जनता आपल्याकडे आंबेडकरी विचारवंत म्हणून मोठया आशेने बघतात, त्यांचं मनोबल खचू देऊ नये, त्यांना जोपासण्याची गरज आहे.आपणे जिथे उभे राहता ती जागा आपलं व्यासपीठ होते. बोलता त्या शब्दांच्या ठिणग्या, मुद्यांचे निखारे आणि भाषणांच्या मशाली होतात. आपली तळमळ, कळकळ, पोटतिडीक आणि पारदर्शक, प्रांजळपणा पाहणाऱ्याला, ऐकणाऱ्याला भारुन भाराऊन टाकते. आपली शब्द योजना अतिशय वेचक आहे, आशय स्पष्ट आणि जिवंत असावा आणि तो सरळ अंतकरणाला भिडावा या विषयी आपण दक्ष असता. हजारोच्या जमावात न कळत उमटुन दिसावे असे आपले आकर्षक व्यक्तिमत्व आहे. आपणास गर्दीचे आकर्षण आहे तर गर्दीला आपले आकर्षण आहे. डॉ. नितीन राऊत म्हणजे उत्साहाचा धबधबा, नम्रतेचा डोंगर, विनयशील आणि कमालीचा संवेदनशील माणुस. आपला सहवास प्रत्येकाला हवा हवासा वाटतो. संयम प्रतिक्षेतली गोडी वाढवणारी असेल, तर प्रतिक्षा भेटीतील ओढ ही कमी होऊ देत नाही. कामाच्या प्रचंड घाईगर्दीत आणि व्यापात सुध्दा आपले बारीक-सारीक घटनांकडे अतिशय काळजीपुर्वक लक्ष असते समोरच्या माणसा विषयीचा जिव्हाळा आपणांस कधीच टाळता आला नाही. आपल्यात निर्भयता आणि शौर्य मोठया प्रमाणात आहे. अनेकदा आपले म्हणुन कुरवाळलेल्यांनी आपल्यावर आत्मघाती आघात केलेत. तरी आपण तोल जाऊ दिला नाही किंवा हतबल झाला नाहीत. काही आपले नि:स्पृह निस्वार्थ चाहते आपल्या धन्वंतरी हातांसाठी दुवांच करीत राहिले. माणसे जोडा, भाग्य त्याबरोबर जोडलं जाईल. यशाच्यामागे हे संस्काराचंही आकाश असतं. त्यासाठी माणसं प्रेमानं जोडा, तोडायला हुशारी लागत नाही, जोडायला स्किल लागतं. आपल्यात चपखल चतुराई असल्यामुळे माणसं जोडणं, जपणं त्यांच्यावर प्रेम करणं असं हळवं, उदार आणि स्नेहपूर्ण मन हा आपला स्थायीभाव आहे. माणूस उत्तम आहे, निर्मळ आहे आणि विश्वासाचा आहे एवढी खात्री आपणास पटली तर आपण त्यांना विलग होऊ देत नाही. मग तो मोठा असो वा सान असो कारण संवेदनाचा ओलावा हेच नात्याचं बलस्थान असते जे आपण चिरकाळ टिकवून ठेवलंत. म्हणुनच येवढा मोठा गोतावळा आपल्यासाठी वाटेल ते करायला धजत असतो. कामाचं नियोजन, आखीव-रेखीव सुत्रबध्दता, एखादा निर्णय कमालीच्या वेगाने घेण्याची क्षमता आपल्या नखशिखात भरली आहे. नकारात्मक लोकांना आपल्या सकारात्मक विचारांनी समजून घ्यायला लावतं. त्यावेळेस कुठे थोडा फार संवाद होतो.घरातील थोरला मुलगा म्हटल्यावर जबाबदारीचं ओझं वाहून नेणं किती कठीण असतं याची जाण घरच्या हलाखीच्या परिस्थितीने आपणांस ठायी-ठायी करुन दिली. केवळ वयाची वडीलकी असून चालत नाही, समजूतीचीही बांधिलकी असावी लागते त्यामुळे खडतर प्रवास करतांना खाच-खडगे तुडवित असहय वेदना, हाल अपेष्टा सोसव्या लागल्या. शेवटी आपणांस नोकरी करावी लागली. शिक्षणही तेवढंच महत्वाचं होतं तेव्हा आत्मविश्वासाने आत्मबळ वाढविले, ती कसोटीच होती. त्यातून स्वत:ला सोसलं-सावरलं. कारण सोसण्याने माणूस खंगत नाही, खचत नाही आणखी कणखर बनतो. आपल्या सहनसीमेचा आपल्यालाच अंदाज नसतो हे आपणांस तीव्रतेने जाणवायला लागलं. ध्येय ध्यास मनाशी बाळगून अत्युच्य होण्याची जिद्द निर्माण केली आणि शिक्षण क्षेत्रात आचार्य पदवी (डॉक्टरेट) प्राप्त करुन कुटुंबाचं नांवलौकिक केलं. कुणाचंही पाठबळ नसतांना, शुन्यातून स्वत:ला शोधत इथवर आणलं. केलं ते कष्टातून आणि अपार जिद्दीतून या तुमच्या धाडसीवृत्तीला सलाम !आयुष्य चहुबाजूंनी पिंजून घेतल्याशिवाय ते फुलून येत नाही. काही मनं चरित्रवाचनानं घडतात, तर काहचं आयुष्यचं एक वाचण्याजोगं चरित्र होत जाते. राजकारणाच्या धकाधकीत आणि उग्र संघर्षाच्या वातावरणात असतांना सुध्दा आपले सुसंस्कृत मार्दव आणि शिष्टाचार यांच्यात आपल्या वागणूकीतील सौष्ठव आणि सौजन्य कधीही उणावले नाही. आपल्यात दडलेल्या चांगुलपणा मुळेच आपणांस हे यश मिळवून दिले. आपल्या गुणांची पावती म्हणून डिसेंबर २००८ पासून ऑक्टोबर २०१४ पर्यंत आपणांस मंत्रीमंडळात संधी मिळाली. गेली सहा वर्षे आपण महाराष्ट्राचं नेतृत्व केलं, प्रामुख्याने त्यात अकोला, वाशिम, यवतमाळ व नागपूरचे पालकमंत्रीपद भुषविलं. तेथीलही समस्याची पुर्तता करण्याचा आटोकाट प्रयत्न सुध्दा केला. काही मार्गी लागल्यात तर काही अधांतरी राहिल्या. कमी जास्त होत असते हे अधोरेखित आहे. पक्षासाठी निष्ठेने निस्वार्थपणे आपण केलेल्या कष्टाचं हे चीज आहे. कवितेचे व संगीताचे आकर्षण आपणांस नेहमीच राहिले आहे आजही आपण आस्वाद घेत असता. प्रत्येक भाषणाच्या शेवटी कविता किंवा शायरी असायलाच हवी हाआपला स्वाभावगूणआहे. प्रत्येक व्यक्तिला सौजन्याची, सौहार्दाची आणि शिष्टाचाराची वागणूक देणे आपल्या रोमारोमात भिनलेलं आहे. त्यामुळे अतिशय छोटया छोटया बाबींकडे आपले लक्ष जात असते, त्यातही आयुष्य दडलेल असतं. दृष्टी दूरगामी असल्यामुळे ते सर्व शक्य होते. आपल्या मनांत खोल आध्यात्मिक प्रेरणा दडलेल्या आहेत. मनाचा व्यापकपणा आणि सहिष्णुता याचा असा काही संगम आपल्या ठिकाणी झाला आहे की, सर्वधर्माच्या विषयी कोणत्याही अंधश्रध्देला वश न होता निर्माण होणारा स्वाभाविक आदर आपल्या वागण्यांत उत्स्फुर्तीने दिसतो, सर्वधर्म हा मंत्र आपण सतत जोपासत असता, त्यामुळे जनमानसात आपली ख्याती आहे. मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो सर्वांशी शिष्टाचार म्हणून वागवत असता. आपल्याला निसर्गाचे वेड आहे. कपडयांचा शौक आहे, साध्या-सुध्या माणसांशी, मुलांशी बोलतांना आपल्याला फार आनंद होत असतो कारण अव्याज निष्पापपणा आपल्याला त्यांच्यात जाणवतो. भान विसरुन गोष्टीकडे वळण्याची आपल्यात अनावर इच्छा मनांत उसळून येते पण आपण तीला आवर घालीत असता. आपण सर्व सामान्य जनतेशी वचनबध्द आहात. कारण आपण दिलेल्या आश्वासनांची पूर्ती झाल्याशिवाय आपल्याला मोकळीक नाही याची जाणीव असल्यामुळे आपला तकादा, खटाटोप आणि सतत पाठपुरावा सारखा सुरु असतो. ती तडीस नेण्याची आपली हातोटी अनाकलनीय आहे.कामातील सुत्रबध्दता आणि चिकाटी यातून हाती घेतलेल्या कामात यश निश्चित असते ही बाब आपल्या लक्षात आल्यावरच त्याचीच पुनरावृत्ती म्हणून स्वत:त एक आदर्श संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण केला. मोवाड मधील पुरग्रस्तांचा प्रश्न असो, हुसैन सागर, रिडल्स, नामांतर, महाबोधी विहार, खैरलांजी, फुलंब्री अशा अनेक प्रश्नांसाठी आपण शासन दरबारी वाचा फोडुन निस्तारण्यास शासनांस बाध्य केले आणि जिकरीने लढा देऊन आपल्या परीने न्याय मिळवून देण्याचा भरकस प्रयत्न केला, हे कुणीही विसरु शकत नाही. 'संकल्प' या सेवाभावी संस्थेच्या वतीने दीक्षाभूमीवर गेल्या ३० वर्षापासून जनतेसाठी भोजनदानाचा कार्यक्रम अविरत राबवित आहात, ज्याला तोड नाही. मंदीर, मस्जिद, गुरुद्वारा, चर्च व समाजभवनाचे बांधकाम करवून एक उच्चांक गाठला, म्हणजे प्रत्येक धर्माला सर्वधर्म समभाव या हेतूनेच समान न्याय दिला आहे. असे कितीतरी उपक्रम आपल्या हयातीत केले व आजही होताहेत. संयम आणि समंजसपणा हे दोन गुण आपल्या अंगी आहेत ते आपल्या भावनांना योग्य प्रकारे लगाम घालू शकतात. तीच कास आपण आपल्या जीवनी अंगीकारली म्हणुन लगाम आपण सैल होऊ दिला नाही, ही आपली कर्तव्यनिष्ठा, कार्यतत्परता म्हणावी लागेल. आजही तारुण्याला लाजवेल अशी कार्यक्षमता आपल्यात विजेच्या लखलखणाऱ्या प्रकाशाच्या चपळाई सारखी दिसते. तारुण्य आपल्या ह्रदयाचे असेच बहरत राहो, हीच सदिच्छा !कर्तव्यदक्ष व कर्तबगार विकासाचा महामेरु म्हणून असलेली आपली ओळख उत्तरोत्तर अशीच वाढत राहो. आपली वैयक्तिक आणि सार्वजनिक कारकीर्द यशस्वीतेसाठी वाढदिनाच्या अगणित शुभेच्छा, अभिनंदन !

नेतृत्व असे की, प्रत्येकानं आपलं म्हणावं
कर्तृत्व असे की, चौफेर नजरेत भरावं




प्रभाकर सोमकुवर
नागपूर
मो.९५९५२५५९५२

# होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी

विशाल वाघमारे
बीड

वीर जिवाजी महाले यांची यशोगाथा आजही अमर आजार आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन, लाखोंचा पोशिंदा छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचवले होते. त्यांच्या या बलिदानाचे स्मरण व्हावे यासाठी दरवर्षी विविध ठिकाणी जीवा महाले यांची जयंती साजरी केली जाते. शूरवीर जीवा माहाले यांच्यासह त्यांच्या घराण्यातील शूर वीरांचा इतिहास त्यांच्यामुळे प्रकाशित झालेला आहे. होता जिवा म्हणून वाचला शिवा या म्हणीतून प्रखर राष्ट्रीयपणाचा वारसा अजरामर करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे अंगरक्षक व एकनिष्ठ सेवक शूर वीर जिवाजी महाले होते. प्रतापगडाच्या पायथ्याशी कोंडवली, जिल्हा सातारा येथील सपकाळ कुटुंबात वीर जिवाजिंचा जन्म ९ ऑक्टोबर १६६५ रोजी झाला. आई-वडिलांच्या निधनानंतर जिवाजी आणि त्यांच्या भावंडांचा सांभाळ देव माहाले यांनी केला. तेव्हापासून त्यांचे आडनाव महाले पडले. त्यानंतर बालपणापासून आलेल्या विविध संकटातून लढ्याच्या काळात मुलांना लढाईचे प्रशिक्षण दिले जायचे.जिवाजी सुद्धा साताऱ्याच्या लाल मातीत मेहनत करणारा पट्टा होऊ लागला. जोर-बैठका, तलवारबाजी, दांडपट्टा चालवणे याचे शिक्षण त्याला मिळाले होते. मातीत कुस्ती खेळणे या प्रशिक्षणात तो चांगला पारंगत झाला. जिवाजी दांडपट्टा असा फिरवायचा पायाच्या खाली ठेवलेल्या लिंबाचे डोळ्यांचे लवते न लवते तो दोन तुकडे करायचा. उंच उड्या मारण्यात तो निष्णात होता. उड्या मारल्यावर हवेतच शत्रूचा शरिराचे दोन तुकडे करत असे. शिवाय त्याची तीक्ष्ण नजर होती, जिवाजी माहाले यांचे मुळगाव कोंडवली बुद्रुक हे वाई तालुक्यात आहे. मात्र हे गाव धोम धरणामुळे स्थलांतरित झाले आहे.महाबळेश्वर जवळ कोंडवली या गावी त्यांचे वंशज सध्या राहत आहे. जिवा माहालाचा मोठा भाऊ हा ताना माहाले जीवा महाराजचा मुलगा सिताराम, सितारामचा मुलगा सुभानजी, सुभानजी चे पुत्र नवरोजी व काळोजी. नवरोजीचा मुलगा हरी आणि काळोजीचा मुलगा सुभानजी आहे. जिवा महाला यांचे वडील पहिलवान होते. ते शिवाजीराजांचे वडील शहाजी यांच्या सेवेत होते.छत्रपती शाहू राजांनी १७०७ मध्ये जीवाजींच्या वंशजांना निगडे, साखर ही गावे इनाम दिली होती. त्या पत्रात जिवा महाला यांच्या मर्दानी, पुरातन व एकनिष्ठ असा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.शिवरायांनी आपल्या अनेक छोट्या-छोट्या मावळ्यांच्या मदतीने प्रचंड मोठे हिंदवी स्वराज्य निर्माण केले, परंतु स्वराज्य निर्माण करताना अनेक मौल्यवान हिरे लयाला गेले. त्यांच्या या कार्यात तन-मन-धनाने या सर्वांनी सहकार्य केले. यात सर्वात महत्त्वाची भूमिका शिवरायांचे अंगरक्षक जिवाजी माहाले यांची होती . शिवरायांना जेव्हा शिवाजी महाराजांविषयी समजले. तेव्हा त्यांनी जिवाजी लाखोच्या सैन्यात दाखल करून घेतले. शिवाजींचा तरणाबांड, भरदार मांजर, पल्लेदार मिशा, नाक सरळ भलेमोठे कपाळ आणि भेदक नजर पाहताच शत्रूही थरथर कापत होते. शरीराने वाघ-सिंह ज्याप्रमाणे भक्ष्य



पकडण्यासाठी धावतात, त्याचप्रमाणे तो अतिशय चपळ होता.शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी विजापूरच्या दरबारात बडी बेगमने सर्व मातब्बर सेनापती सरदारांना बोलावले होते. तिने सर्वांना सवाल केला शिवाजीला कोण पकडून आणेल. दरबारात तर शांतता पसरली तेवढ्यात मागून एक प्रचंड देहाचा पायातील वाहना करकर आवाज दरबारात आला. त्याने बडी बेगमचे आव्हान स्वीकारले. अफजलखान निश्चित हे काम फत्ते करणार असा विश्वास तिला वाटू लागला. भल्याबुऱ्या मार्गाने किंवा विश्वासघाताने अनेक शत्रूंना संपवण्यात तो तरबेज होता. अफजलखान आपल्यासोबत हजारो सैन्य मोठं घोडदळ पायदळ घेऊन मजल दर मजल करत महाराष्ट्रात दाखल झाला होता. तेव्हा शिवराय रायगडावर होते. रायगड सोडून शिवरायांनी प्रतापगडावर जाण्याचा विचार केला कारण प्रतापगड सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय योग्य किल्ला होता. शिवाय डोंगरी किल्ला असल्याने एकावेळी एकच व्यक्ती येथे जाऊ शकत होता.आजूबाजूचा परिसर संपूर्ण जंगलाने वेढलेला होता. त्यात हिंस्त्र पशू प्राणी जंगली श्वापदांचा वावर असल्याने प्रतापगड वर जाणे खूपच अवघड होते. शिवाय शिवराय प्रतापगडावर पोहोचल्याचे वृत्त समजताच बद्दल अफजल खान खूप चिडला. त्याने हिंदू देवदेवतांची मंदिर पाडण्यास सुरुवात केली. त्यामुळे तर शिवाजीराजे खाली येतील असा त्यांचा डाव होता.शिवरायांनाही माहीत होत. ते पाहून त्यांना सेवका मार्फत शिवाजी यांना भेटण्याचा निरोप पाठविला. तुम्ही माझ्या मुलासारखे मलाही भेटण्यास या आमचे किल्ले परत द्या. मी तुम्हाला बादशहाकडून जाहीर देतो. शिवरायांनी टोला मारला, 'मला तुम्हाला भेटण्याची भीती वाटते, तुम्ही प्रतापगडाच्या पायथ्याशी या ' असे म्हणताच अब्जल खान खुश झाला.भेटीची तारीख आणि वेळ ठरली महाराजांनी सगळ्यांना कामे वाटून दिली. जिवा तुम्ही सय्यद बंडावर नजर ठेवायची असे सांगून त्यांना सोबत घेतले भेटीचा दिवस उजाडला प्रतापगडाच्या पायथ्याशी सुंदर शामियाना उभारण्यात आला होता. अफजल खानचे मनोराज्य चालू होते. महाराज गडाच्या पायऱ्या उतरत असताना, थोड्या अंतरावर सय्यद बंडा उभा होता.जीवांनी सय्यद बंडा विषयीची माहिती महाराजांना दिली. त्याला तेथून दूर करण्यास सांगितले. महाराजांनी वकिलामार्फत निरोप पाठवून सय्यद बंडास दूर करण्यास सांगितले. अफजलखान त्यांचा वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी शामियान्यात होते. अफझलखानने शिवरायांना दोन्ही हात हवेत पसरून आलिंगन दिले.त्यांची मान डाव्या कुशीत दाबून ठेवली आणि उजव्या हाताने कट्यार पाठीवर केला अंगात चिखलत असल्याने कट्यार घसरत गेली. शिवरायांनी क्षणाचाही विलंब न लावता. असतऱ्यात लपवलेला बिचवा काढून खानाच्या पोटात खुपसला शिवरायांवर त्यांच्या वकिलांनी हल्ला चढविला.शिवाजीराजांनी कृष्णाजी कुलकर्णी यांचे ही तलवारीने दोन तुकडे केले. सय्यद बंडा गोंधळाचा आवाज ऐकून धावत आला. महाराजांवर हल्ला करणार इतक्यात जीवा माहालेने सय्यद बंडाचा समशेर असलेला हात वरच्यावर हवेत कापला. शिवरायांनी या लढायचे कौतुक वाटले व तेव्हापासून 'होता जीवा म्हणून वाचला शिवा' ही म्हण आजही प्रचलित आहेजीवा महाला समाधी:जीवा माहाले यांची समाधी राजेश्वर किल्ल्याच्या पायथ्याशी अंबावडे गावात वीर कान्होजी जेधे यांच्या समाधी स्थळाजवळ आहे.जीवा महाले यांनी शिवाजी महाराजांचे प्राण वाचवलेची ही घटना तीनशे साडेतीनशे वर्षापूर्वी घडलेली आहे. परंतु ती आजही अजरामर आहे.अशा तऱ्हेने इतिहासाच्या पानांमध्ये प्रतापगड येथील अपघात अफजल खानाची आणि शिवरायांची भेट अजरामर झाली. त्याचप्रमाणे या लढाईत जिवा माहाला यांचे शौर्य देखील सर्वांच्या लक्षात व कायमचे कोरले गेलेले आहेत.

# महिलांनी उद्योगातून आर्थिक उन्नती साधावी:भाग्यश्री आत्राम

## संकल्प सप्ताह-समृद्धी दिवस साजरा



आलापल्ली । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील महिलांची शाश्वत उपजीविका वृद्धिंगत करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान या प्रकल्पाच्या माध्यमातून शाश्वत शेती, पशूपालन, मत्स्यपालन, प्रक्रिया उद्योग याकरिता व्यक्तिगत व सामुहिक उपजीविका उपक्रमाच्या विकासातून उत्पन्न वाढीसाठी तांत्रिक मार्गदर्शन व अर्थसहाय्य करण्यात येते.त्या माध्यमातून महिलांनी उद्योगातून आर्थिक उन्नती साधावी असे आवाहन माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांनी केले.

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पंचायत समिती अहेरी अंतर्गत जननी महिला प्रभाग संघ आलापल्ली तर्फे ग्रामपंचायत भवण येथे संकल्प सप्ताह-समृद्धी दिवस साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जननी महिला प्रभाग संघाचे अध्यक्ष वंदना राजेश आत्राम,प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका व्यवस्थापक सतीश उमरे,ग्रा प सदस्य पुष्पा अलोने, माजी सरपंच सुगंधा मडावी,शकुंतला दुर्गम,प्रभाग समन्वयक शालिनी लोणारे,प्रतिमा गावतुरे,प्रियांका गोंगले,गीता कविराजवार,लक्ष्मी रामटेके,राजश्री जनकर,लैजा बोरूले, अनुशा करपे आदी उपस्थित होते.पुढे बोलताना गाव स्तरावर उपजीविकेचे विविध सुविधा उपलब्ध करण्यासाठी ग्राम संघ व प्रभाग संघ, महिला शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करून त्यांना अर्थसहाय्य व कृतीसंगमच्या माध्यमातून शासनाच्या इतर योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शनातून संकलन केंद्र उभारणे ,शेती अवजार बँक स्थापन करणे,महिला शेतकऱ्यांची शेती शाळा घेणे ,विविध संस्थाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांकरिता तांत्रिक प्रशिक्षणासाठी नियोजन करणे असे विविध उपक्रम राबविले जातात. महिला बचत गट अधिकाधिक प्रगतीपथावर गेल्यास महिला सक्षम होईल. या माध्यमातून अन्य महिलांना देखील प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ महिलांनी घेतला पाहिजे असे आवाहन देखील त्यांनी केले.आयोजित कार्यक्रमाचे प्रस्ताविक सतीश उमरे,संचालन मनीषा जंबेवार तर आभार मनीषा दुर्गे यांनी मानले.

**बचत गटांना धनादेश वाटप**

**बचत गटाच्या महिलांच्या उद्योगधंद्यात वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून ८ गटांना प्रत्येकी ७५ हजार रुपयांचा धनादेश वितरण करण्यात आले. संकल्प सप्ताह निमित्ताने १७ महिलांचे वयक्तिक बँक खाते उघडण्यात आले.तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा,प्रधानमंत्री जीवन सुरक्षा विमा अंतर्गत १४८ महिलांचे विमा काढण्यात आले.**

**प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेची दिली माहिती**

**ग्राम संघांना अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण देऊन त्यांना प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत त्यांना ५ टक्के व्याजदरात तीन लाख रुपये पर्यंत कर्ज देण्यात येते.त्यात पहिला हप्ता १लाख,दुसरा हप्ता २ लाख आणि तिसरा हप्ता ३ लाख अश्या प्रकारे काही प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना देण्यात येतो.या योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली.**

# आदित्य ठाकरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालयाची पाहणी करणार-अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर-**आमदार आदित्य ठाकरे ता. ०९ ऑक्टोंबर रोजी छत्रपती संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील रुग्ण संख्या, औषधांची मागणी,उपलब्ध साठा, रुग्णांकरिता सुविधा व रिक्त पदे याबाबत अधिष्ठाता यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी पाहणी करणार असल्याची माहिती विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली.०३ ऑक्टोंबर रोजी घाटी येथे आरोग्य सुविधा अभावी १४ रुग्ण एका दिवशी दगावलेच्या पार्श्वभूमीवर त्यांची ही पाहणी भेट असणार आहे.सकाळी १० वाजून ४० मिनिटांनी ते चिखलठाण विमानतळ येथे पोचणार असून ११ वाजता घाटीला जाणार आहेत. यासोबतच ते राज्यातील नांदेड व नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांची सुद्धा पाहणी करून अधिष्ठातांसोबत वैद्यकीय सुविधा बाबत चर्चा करणार आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे ठाणे, त्यानंतर नांदेड आणि आता छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयातूनही धक्कादायक बातमी समोर येत आहे. संपूर्ण मराठवाड्यातील गोरगरीब रुग्णांचा भार असलेल्या संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात २४ तासांत १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे समोर आले. त्यामुळे शासकीय रुग्णालयांना पुरवण्यात येणारा अपुरा निधी, अपुऱ्या सोईसुविधा, निधीअभावी औषधांचा अभाव, थांबलेली नवीन कर्मचाऱ्यांची भरती असे अनेक मुद्दे ऐरणीवर आले आहेत.केवळ मराठवाडाच नव्हे तर आसपासचे १२ ते १४ जिल्ह्यातील गोरगरीब रुग्ण हे घाटी रुग्णालयावर अवलंबून आहे. दररोज हजारो रुग्ण इथे उपचारासाठी येत असतात. मात्र, घाटी रुग्णालयात २४ तासांत १८ रुग्णांचा मृत्यू झाला. या मृतांमध्ये २ बालकांचा समावेश आहे.शरद पवार यांनी ट्विट करत नांदेड व छत्रपती संभाजीनगरमधील शासकीय रुग्णालयांतील मृत्यूंबाबत संताप व्यक्त केला आहे. नांदेड येथे २४ रुग्णांचा मृत्यू झाल्यानंतर काल रात्री पुन्हा सात रुग्णांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. त्यात चार बालकांचा समावेश होता. तर, छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयातही २४ तासांत १० रुग्णांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

# खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा मंच युवकांना भरारी देणारा

## नाट्यगृहासाठी जागा शोधा, पैसा मी देतो : उपमुख्यमंत्री फडणवीस

भंडारा । प्रतिनिधी

देशाच्या विकासात तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वच क्षेत्रात विकास साधला जात असताना युवा पिढीचा वाटा दुर्लक्षित करून चालणार नाही. आज भारत बदलत असताना, बदलत्या भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तरुणांना खासदार महोत्सवाचा हा मंच उंच भरारी घेण्यासाठी पोषक असा आहे. ग्रामीण भागात असलेल्या कलावंतांना वाव देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. साकोली येथे नवीन नाट्यगृह तयार करण्यासाठी शासन पैसा देईल, जिल्हाधिकाऱ्यांनी जागा शोधावी असे राज्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साकोली येथे जाहिररित्या सांगितले. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या माध्यमातून, खासदार सुनील मेंढे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या आणि स्वर्गीय बाबुराव मेंढे स्मृती प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वैनगंगा पांगोली खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमाचे उद्घाटन साकोली येथील परेड ग्राउंड वर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.मागील महिनाभरापासून भंडारा गोंदिया लोकसभा मतदार संघातील सर्व तालुका स्तरावर युवक, युवती आणि महिलांच्या समूह नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. पारंपरिक लोकनृत्याचाही समावेश यात होता. तालुकास्तरावर विजेत्या संघांसाठी लोकसभा स्तरीय स्पर्धा आणि खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा समारोपीय सोहळा ७ व ८ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी आयोजित कार्यक्रमाला व्यासपीठावर आ.विजय रहांगडाले, माजी आ. परिनय फुके, जिल्हाध्यक्ष प्रकाश बाळबुधे, गोंदिया चे जिल्हाध्यक्ष उपराडे, संजय पूराम, डॉ. हेमकृष कापगते, संजय भेंडे, राष्ट्रवादीचे नेते धनंजय दलाल, नाना पंचबुद्धे, सोमदत्त करंजेकर, प्रदीप पडोळे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष संदीप टाले, निशिकांत इलमे, मनीष कापगते, ओम कटरे



उपस्थित होते. दीप प्रज्वलन झाल्यानंतर तालुका स्तरावर विजेत्या पहिल्या क्रमांकाच्या संघांना देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. तर अनुसूचित जमाती समाजातील लोकप्रतिनिधींचा सत्कारही यावेळी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्व. बाबुराव मेंढे स्मृती प्रतिष्ठानच्या शुभांगी मेंढे यांनी केले. आमच्या जिल्ह्यातील कलावतांच्या गुणांना वाव देण्यासाठी शासनाने त्याच्या पाठीशी राहावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मार्गदर्शन करताना खा. सुनील मेंढे यांनी सांस्कृतिक महोत्सवातून जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रतिभा शहरात पोहचली असे सांगितले. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात साधला जात असलेला विकास सर्वश्रुत आहे. अशावेळी देवेंद्र फडणवीस यांचा नेतृत्वात महाराष्ट्राने घडविलेला बदलही तेवढाच उल्लेखनीय आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी साकोली सांस्कृतिक नाट्यगृह मंजूर करण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. यावेळी उपस्थित यांना मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आदिवासी संस्कृती आणि तरुणाईला मोठा मंच मिळावा म्हणून खासदार महोत्सवाचा प्रयोग नक्कीच कौतुकास्पद आहे. भंडारा गोंदिया हे कलेचे माहेरघर आहे. जिल्ह्याला सांस्कृतिक वारसा लाभला आहे. झाडीबोलीतील नाटके आपले वेगळे महत्त्व जपून आहेत. खडीगंमत, दंडार आणि भंडारा गोंदिया जिल्ह्यातील मंडई केवळ मनोरंजनच नाही तर समाज बांधण्याचे काम करीत असल्याचे यावेळी म्हणाले. आमच्या जिल्ह्यातील आदिवासी नृत्य विदेशातही आपला वेगळा ठसा उमटवू शकते. मात्र या तरुणाईला योग्य दिशा आणि मार्गदर्शनाची गरज आहे. यशस्वी पंतप्रधानांच्या नेतृत्वात विकास साधला जात आहे. त्यात युवा पिढीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. अशावेळी पुढे जात असलेल्या आणि बदलत्या भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तरुणांना खासदार युवा महोत्सव नवसंजीवनी देणारा ठरेल असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले. खासदार सुनील मेंढे यांनी केलेल्या मागणीला दुजोरा देत देवेंद्र फडणवीस यांनी भाषणा दरम्यानच जिल्हाधिकाऱ्यांना जागा तुम्ही शोधा पैसा मी देतो असे सांगून खासदार सुनील मेंढे यांची मागणी मार्गी लावली.यावेळी उपस्थितांनी प्रचंड टाळ्यांच्या गजरात या घोषणेचे स्वागत केले.कार्यक्रमाला सकाळ पासून सुरुवात झाली होती. दोन्ही जिल्ह्यातील अनेक संघाचे सादरीकरण दिवसभरात झाले आणि त्यांनी प्रेक्षकांची दादही मिळवली. यावेळी मुंबई येथून आलेल्या ब्रिटन गॉट टॅलेंट च्या एक्स वन एक्सच्या सादरीकरणामुळे प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले.

# केंद्रातील मोदी सरकारचे व राज्य सरकारचे निर्णय समाज व युवा पिढीसाठी घातक-डॉ. किरसान

वडसा । प्रतिनिधी

मौजा कुरुड ता. देसाईगंज (वडसा) येथे श्री युवा गणेश उत्सव मंडळ कांबळी मोहल्ला कुरुड यांच्या वतीने आयोजित सोनम पवार प्रस्तुत जागरण कार्यक्रमाचे उद्घाटकीय भाषणात बोलतांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी महासचिव तथा गडचिरोली-चिमूर लोकसभा समन्वयक डॉ. नामदेव किरसान यांनी केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील भाजप प्रणित सरकार समाजाला व युवा पिढीला घातक निर्णय घेत असून त्यापासून सावध राहण्याची गरज असल्याचे सांगितले. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, केंद्रातील मोदी सरकारने महागाई बेरोजगारी कमी करण्याचे, विदेशातून मोठ्या प्रमाणावर काळा धन आणून प्रत्येकाच्या खात्यात १५ - १५ लाख रुपये जमा करण्याचे, हवाई चप्पलवाल्यांना हवाई जहाजातून नेण्याचे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे, शेतमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याचे, २०२२ पर्यंत प्रत्येक बेघराला पक्के घर देण्याचे व असे अनेक दिलेली आश्वासने पूर्ण केलेली नाहीत. याउलट जीवनावश्यक वस्तू, शैक्षणिक साहित्य व इतर वस्तूंवर मोठ्या प्रमाणावर जीएसटी च्या रूपाने कर लादून महागाई वाढवलेली आहे. डिझेल पेट्रोलच्या



उत्पादन शुल्कात मोठ्या प्रमाणावर वाढ करून जनतेच्या खिशातून मोदी सरकारने २३ लाख कोटी काढून घेतलेले आहेत, जीएसटीच्या रूपाने कर आकारून लाखो कोटी रुपये जमा केलेले आहेत, याचे त्यांनी काय केले याची विचारणा करण्याची गरज आहे.ज्याप्रमाणे जिओचा सिम फुकट दिला व आता रिचार्जचे पैसे वसूल करत आहेत, त्याच पद्धतीने गरिबांना गॅसचं कनेक्शन फुकट दिलं व गॅस भरण्याच्या किंमती तीन पटीने वाढवून वसुली करीत आहेत. हे कल्याणकारी सरकार नसून जनतेला लुबाडण्याचा व्यापार करणारी टोळी आहे. सार्वजनिक उपक्रमांची विक्री झपाट्याने करून सरकारी नोकऱ्या संपविण्याचं काम हे सरकार करीत आहे. राज्यातील भाजप प्रणित सरकारने नोकर भरती कंत्राटी पद्धतीनं करण्याचं ठरवलेलं आहे. कंत्रालदारांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. कंत्राटदार आपल्या मर्जीप्रमाणे लोकं भरतील, एससी एसटी ओबीसी चे आरक्षण राहणार नाही. अशा रीतीने सरकारी नोकऱ्या संपवून आरक्षण बंद करण्याचं काम हे सरकार करीत आहे. मराठा जातीच्या लोकांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देऊन त्यांचा समावेश ओबीसी मध्ये करण्याचा राज्य सरकारचा तुघलकी निर्णय असंवैधानिक आहे. करिता सावध राहण्याची गरज आहे. जेव्हा ही लोकं मतं मागायला येतील तेव्हा त्यांना जाब विचारा असे आवाहन त्यांनी केले.यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मनोहर पाटील पोरेटी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव डॉ. नितीन कोडवते, किसान काँग्रेस जिल्हाध्यक्ष वामनराव सावसाकडे, ओबीसी काँग्रेस प्रदेश सचिव मनोज ढोरे, माजी पंचायत समिती उपसभापती नितीन राऊत, मनोहरजी निमजे, अरुणजी कुंभलवार, महिला काँग्रेसच्या आरती लहरी, विजय कुंभलवार, दिनकरजी राऊत, कृष्णाजी ठाकरे, अमरजी भर्रे, निक्की रामानी व गणमान्य मंडळी तसेच मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित होते.

## विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वात भारत–जपान मैत्री दृढ होईल

# वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

## जपान येथे 'इंडिया मेला'कार्यक्रमात महाराष्ट्राच्या कलावंतांचे आकर्षक सादरीकरण

**कोवे (जपान) । प्रतिनिधी**

'इंग्रजी वर्णाक्षरांमध्ये 'आय' आणि 'जे' ही दोन अक्षरे जवळ आहेत. 'आय' म्हणजे इंडिया आणि 'जे' म्हणजे जपान. वर्णाक्षरांप्रमाणेच इंडिया आणि जापानही एकमेकांच्या जवळ आहेत. 'इंडिया मेला'च्या निमित्ताने या दोन्ही देशांमधील सौहार्द, मैत्रीभाव घट्ट होऊन एकत्रीतपणे प्रगतीची नवी शिखरे सर करतील,' असा विश्वास व्यक्त करून विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वात भारत आणि जपानमधील ही मैत्री अधिक दृढ होईल अशी खात्री महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.जपान येथील कोबे शहारात भारत–जपान यांच्यातील कला आणि खाद्य संस्कृतीला चालना देण्यासाठी आयोजित 'इंडिया मेला' या कार्यक्रमाच्या उदघाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी जपानचे उच्चायुक्त सिविजाज, कोवे उपमहापौर काजुनरि उहारा, तेजसिनियमशिता, निखिलेश गौरी राम कलानी, भावेन जवेरि, चेंबर ऑफ कॉमर्स चे जॉनी लालवाणी, सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. ते म्हणाले, सर्वात आधी सूर्याची किरणे जपान या






देशावर पडतात; सर्वप्रथम सूर्यदर्शन होणारा हा देश आहे. आमचा भारत जेथे कोणार्कला सूर्य मंदिर आहे, नेहमीच सूर्यपूजक जपानशी मैत्रीपूर्ण संबंध जपून ठेवत आला आहे. अध्यात्मिक दृष्टीकोनातून भारत आणि जपान यांच्यात अतिशय प्रेमाचे संबंध राहिले आहेत. 'युद्ध नको बुद्ध हवा' अर्थात 'जियो और जिने दो', असा संदेश देणारे बुद्धिझम भारतातून जपानमध्ये आले आहे; हा विचार जपानच्या घराघरात आणि मनामनात पोहोचविण्याचा जपानने सातत्याने प्रयत्न केला आहे; ज्यात त्यांना यश आले आहे.' ओघवत्या हिंदी भाषेत आणि त्यांच्या विशेष शैलीत बोलताना ना. मुनगंटीवार म्हणाले, 'मला यासाठी जपान या देशाचे आकर्षण असण्याचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे, भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात देशासाठी लढणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांना साथ देणारा हा देश आहे. टोकीयो शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस यांचं मंदिर याची साक्ष देत असून मला याबद्दल जपानचा आदर आणि अभिमान वाटतो.' संस्कृती आणि परंपरा ही जीवन जगण्याची कला आहे. धन माणसाच्या भौतिक समाधानाचे साधन आहे तर संस्कृती हे मनाच्या समाधानाचे उत्तम साधन आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघ देखील कोणता देश किती धनवान आहे यापेक्षा तो किती गुणवान आहे या आधावर त्या देशाच्या आनंदाची व्याख्या निश्चित करीत आहे, असेही ते म्हणाले.

**ना. मुनगंटीवार यांची जपानी भाषेत भाषणाची सुरुवात**

भाषणाची सुरुवात जपानी भाषेत ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केली. यावेळी उपस्थितांनी टाळ्या वाजवत ना.मुनगंटीवार यांचे स्वागत करत प्रतिसाद दिला. यावेळी आपल्या भाषणात ना.मुनगंटीवार म्हणाले जपानी बांधवांना भेटण्याची संधी मिळाली याचा खूप आनंद झालाय, सर्वांशी संवाद साधण्याचे सौभाग्य प्राप्त झाले याचे समाधान वाटत आहे.

**महाराष्ट्राचा अभिमान**

जगात १९३ राष्ट्र आहेत, परंतु महाराष्ट्र मात्र एकच आहे, आणि तो आमचा आहे, याबद्दल अभिमान आहे, या शब्दांत ना. मुनगंटीवार यांनी भावना व्यक्त केल्या. महाराष्ट्राच्या संस्कृतीक कार्यक्रमांचे जपानमध्ये सादरीकरण झाल्याचा मला राज्याचा मंत्री म्हणून मनापासून आनंद झाला आहे. महाराष्टाच्या कलाकारांनी अतिशय उत्साहाने कार्यक्रम सादर केले, त्यांचे मी अभिनंदन करतो: त्यांच्या कार्यक्रमामुळे जपान च्या कोबे शहरातील कला रसिकाच्या चेहऱ्यावरील आनंद व उत्साह बघून खूप आनंद वाटतोय असेही ते म्हणाले.

## अहेरीत शिवसेना ठाकरे गटाची होऊ द्या चर्चा मोहीम

**अहेरी । प्रतिनिधी**

अहेरी तालुक्यातील प्रभाग क्रमांक ०५ रमेश वेलादी यांच्या घरासमोरील चौकात महेश केदारी गडचिरोली जिल्हा संपर्कप्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली होऊ द्या चर्चा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता . यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक जिल्हा प्रमुख रियाज शेख तसेच प्रमुख अतिथी प्रफुल्ल एरणे तालुकाप्रमुख ,अहेरी ग्रामीण तालुकाप्रमुख सुनील वासनिक, सदस्य नगरपंचायत अहेरी विलास सिडाम, तुळजा तलांडे युती सेना जिल्हा अधिकारी चंदना बिश्नोई उपजिल्हा संघटिका सपना ईश्वरकर तालुका संघटिका नखिर शेख शहर प्रमुख आयान पठाण युवा सेना शहर अधिकारी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महेश केदारी यांनी आपल्या मार्गदर्शनात केंद्र शासन व राज्य शासन ला धारेवर धरले. उपस्थित जनतेला अच्छे दिन आले का असा प्रश्न उपस्थितांना विचारला त्यावर जनतेनी तीव्र निषेध करीत वाईट दिवस आल्याचे म्हणत राज्य सरकार वर रोष व्यक्त केला.महेश केदारी समोर आपल्या भाषणात म्हणाले की अहेरी विधानसभा क्षेत्रात रस्त्याची फार गंभीर समस्या असून पाचही तालुक्यातील रस्ते खड्डेमय झालेले आहे. आलापल्ली सिरोंचा महामार्ग मागील पाच–सहा वर्षांपासून खड्ड्यात रस्ते की रस्त्यात




खड्डे अशी गंभीर परिस्थिती असतानाही केंद्र सरकार व राज्य सरकार केवळ कागदावर घोषणाबाजी करीत आहे, एकही योजनाच्या गोरगरीब जनतेला लाभ मिळत नाही देशात शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार, व्यापारी, मध्यमवर्गीय कर्मचारी, सर्वसामान्य जनता केंद्र व राज्य शासनाच्या धोरणापासून त्रस्त झालेली आहे.दिवसेंदिवस देश हुकूमशाहीकडे वळून राहिला हे लोकशाहीसाठी घातक असल्याने देशातील व राज्यातील जनतेला एक होऊन भाजपा सरकारला हद्दपार करणे अत्यंत आवश्यक आहे. संविधानाचे रक्षण करणे देशातील सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे.गडचिरोली जिल्ह्यात खनिज संपत्ती वनसंपत्ती असतानाही या जिल्ह्याच्या विकास न होण्याचे कारण केवळ येथील लोकप्रतिनिधी जबाबदार असल्याच्या तीव्र रोष व्यक्त करीत महेश केदारी यांनी गंभीर आरोप यावेळी केले तसेच रियाज शेख जिल्हाप्रमुख यांनी केंद्र शासन व राज्य शासनावर आरोप करीत सांगितले की शासन आपल्या दारी हा उपक्रम केवळ निवडणुकीच्या तयारीसाठी प्रचार व प्रसार करीत आहे .यांना जनतेशी काही घेणेदेणे नाही सध्याच्या परिस्थितीत केंद्र शासन व राज्य शासनावर जनता तीव्र नाराजी व्यक्त करीत असल्याच्या चित्र दिसल्याने मागील दोन वर्षापासून जिल्हा परिषद, पंचायत समिती ,नगरपरिषद, महानगरपालिका निवडणुका समोर ढकलण्यात येत आहे.महायुती सरकारला माहित आहे निवडणुकी घेतल्यास भुईसपाट होणार म्हणून घाबरलेली त्रिमूर्ती सरकार निवडणुकी घेत नाही व निवडणुका जाहीर करणार नाही असे जिल्हाप्रमुख रियाज शेख यांनी आपल्या भाषणात सांगितले. प्रास्ताविक भाषण प्रफुल एरणे तालुकाप्रमुख यांनी केले. होऊ द्या चर्चा या कार्यक्रमाचे शेवटी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख यांच्या कुशल नेतृत्वावर विश्वास ठेवून शोभा कुंभरे, दिनेश रंगुलवार, अक्षय कुळमेंते, आरिफ शेख, आलम अन्सारी, अक्षय औतकर, बापू ठाकरे, गणेश गुरूनुले, शोभा गुरूनुले, तर अशा असंख्य महिला व पुरुषांनी महेश केदारी यांच्या शुभहस्ते शिवसेनेच्या भगवा दुपट्टा टाकून पक्ष प्रवेश घेण्यात आला.अहेरी विभागात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात सतत इनकमिंग सुरू असल्याचे चित्र दिसत आहे हे विशेष.

## सर्व सामान्य लोकांना न जगू देणे ही भाजपची प्रवृत्ती–नाना पटोले

**मुंबई**–सर्व सामान्य लोकांना न जगू देणे म्हणजे ही भाजपची प्रवृत्ती आहे असे म्हणत भाजप राहुल गांधी यांना जर रावण म्हणत असतील तर महागाई, बेरोजगारी कोणी वाढवली? असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे. सर्वच राजकीय पक्षांना आगामी लोकसभा तसेच विधानसभा निवडणूकांचे वेध लागले आहेत. या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून मोर्चेबांधणी सुरू केली आहे. आज पुण्यात काँगेसतर्फे पश्चिम महाराष्ट्र जिल्हा विभाग निहाय बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला.नाना पटोले म्हणाले की, राज्यात नागरिकांचा सरकारी दवाखान्यांमध्ये मृत्यू होत आहे. शेतकरी मरत आहेत, मात्र राज्य सरकारला कोणाचीच चिंता नाही. महाराष्ट्र सरकार सेल्फिश सरकार आहे आणि दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांचा मुख्यमंत्री पदावर डोळा आहे, अशा शब्दात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारवर निशाणा साधला.नाना पटोले यांनी भाजपवरही जोरदार टीका केली. सर्व सामान्य लोकांना न जगू देणे म्हणजे ही भाजपची प्रवृत्ती आहे असे म्हणत भाजप राहुल गांधी यांना जर रावण म्हणत असतील तर महागाई, बेरोजगारी कोणी वाढवली? असा सवाल त्यांनी विचारला.तसेच पक्षाच्या संघटनात्मक बैठका राज्यात सुरू आहेत. काँग्रेस आता भाजपच्या रावण प्रवृत्तीचा चेहरा दाखवण्यासाठी राज्यभर दौरे करणार, अशी माहितीही नाना पटोले यांनी यावेळी



दिली. पुण्यातील काँग्रेस भवनात ही बैठक पार पडली. बैठकीला अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, प्रणिती शिंदे यांची उपस्थिती होती.नाना पटोले यांनी काही दिवसांपूर्वी ठाण्यात कार्यकर्त्यांशी संवाद साधत कपिल पाटील हे राज्यमंत्री आहेत. त्यांच्याकडे फाईल येते की नाही माहीत नाही; पण सर्व कारभार प्रधानमंत्री कार्यालयातून चालतो. त्यामुळे कपिल पाटील नावापुरते मंत्री आहेत. भिवंडी लोकसभेत मागील दहा वर्षांत त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता झाली नसून, भिवंडी लोकसभेतील नागरिकांमध्ये भाजपविरोधात प्रचंड संताप आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

# राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या जनसुनावणीत वेकोलि प्रकल्पग्रस्तांचे विविध प्रलंबित प्रश्न मार्गी

## प्रलंबित प्रश्नी १ महिन्यात अहवाल सादर करण्याचे हंसराज अहीर यांचे निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील मागासवर्गीय व अन्य प्रवर्गातील वेकोलि प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या वतीने दि. ७ ऑक्टोंबर ला नागपूर येथील रवीभवनात जनसुनावणी घेण्यात आली. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या जनसुनावणीत उपस्थित वेकोलिच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना विविध प्रलंबित प्रश्नांवर निर्धारीत कालावधीत निर्णय घेण्याचे निर्देश एनसीबीसी अध्यक्ष अहीर यांनी दिले.या जनसुनावणीस वेकोलिचे अध्यक्ष तथा प्रबंध निदेशक मनोज कुमार, वेकोलिचे तांत्रिक निदेशक, कार्मीक निदेशक, चंद्रपूर, बल्लारपूर, वणी, वणीनॉर्थ, माजरी क्षेत्राचे मुख्य महाप्रबंधक, नियोजन अधिकारी माजी आमदारद्वय ड. संजय धोटे, सुदर्शन निमकर, वणीचे भाजपा जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजु घरोटे, धनंजय पिंपळशेंडे, ड. प्रशांत घरोटे, डॉ.अंकुश आगलावे, पवन एकरे, सचिन शेंडे, बालनाथ वडस्कर, प्रशांत डाखरे, पुनम तिवारी यांचेसह दोन्ही जिल्ह्यातील शेकडो प्रकल्पग्रस्त बांधव उपस्थित होते.

बल्लारपूर क्षेत्रातील चिंचोली प्रकरणात येत्या महिनाभरात निर्णय घेण्याचे, माजरी क्षेत्रातील पाटाळा वेकोलि, महसुल व अन्य विभागाच्या अधिकारी व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत स्थळ निरिक्षण करून २ महिन्यात आयोगाला अहवाल सादर करण्याची तसेच धोपटाळा येथील ८४ एकड जमिन ओबी डंप व नाल्यामुळे प्रभावित होत असल्याने स्थळ निरिक्षण करून १५ दिवसात आयोगाला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या जनसुनावणीत एनसीबीसी अध्यक्ष हंसराज अहीर यांनी बल्लारपूर क्षेत्रातील चिंचोली रिकॉस्ट परियोजना, चंद्रपूर क्षेत्रातील भटाळी, माजरी क्षेत्रातील पाटाळा, एकोणा वणीनॉर्थ क्षेत्रातील मुगोली, पिंपळगांव वणीक्षेत्रातील घुगूस यासह अनेक प्रलंबित प्रश्नांच्या निपटाऱ्याकरीता वेकोलिच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना निर्धारीत अवधीमध्ये कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.या सर्व वेकोलि क्षेत्रामध्ये बहुसंख्य प्रकल्पग्रस्त हे मागासवर्गीय प्रवर्गातील असल्याने वर्षानूवर्षे त्यांना न्याय अधिकारांपासून वंचित ठेवण्याची वेकोलि अधिकाऱ्यांची कृती घटनाबाह्य असुन हा अन्याय त्वरीत दूर करण्याचे स्पष्ट निर्देश अहीर यांनी या सुनावणीमध्ये वेकोलि अधिकाऱ्यांना दिले.या जनसुनावणीत बल्लारपूर क्षेत्रातील चिंचोली येथील शेतकऱ्यांच्या जमिनी २०१५ मध्ये अधिग्रहीत करूनही या प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या व मोबदला दिला नाही. त्यामुळे डीनोटीफीकेशन करीता पाठविण्यात आलेला



प्रस्ताव रद्द करून संपादीत जमिनीचे प्रतिएकरी भावाने करारनामे करून आर्थिक मोबदला व नोकरी देण्याबाबत यासंदर्भात महिनाभरात निर्णय घेण्याचे निर्देश दिले. या प्रकरणात काही शेतकऱ्यांनी जनहित याचिका दाखल केल्याची माहिती असुन त्यानुसार प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांचा विषय तपासून तातडीने निर्णय घेण्याची सुचना केली.माजरी क्षेत्रातील पाटाळा येथील उर्वरीत २० टक्के जमिनीचे अधिग्रहण व पुनर्वसन, मौजा सास्ती येथील अधिग्रहणवंचित ८४ एकर जमिनीचे अधिग्रहण, पोवनी येथील उर्वरीत १० टक्के जमिनीचे अधिग्रहण तसेच पुनर्वसन विषयक प्रश्नांबाबत या जनसुनावणीत सकारात्मक चर्चा झाली या वेळी अध्यक्षांनी याप्रश्नी तातडीने कार्यवाहीच्या सुचना केल्या. पोवनीवासीय शेतकऱ्यांना मशागत करणे शक्य नसल्याने सीएमपीडीआयद्वारा सर्व्हेक्षण करून अधिग्रहणाची कार्यवाही करावी तसेच गाडेगाव विरूर येथील उर्वरीत १७ टक्के जमिनीचे अधिग्रहण विषयक प्रकल्प अहवालास त्वरीत मंजुरीकरीता कार्यालयीन स्तरावर कार्यवाही करण्याचे निर्देशही एनसीबीसी अध्यक्षांनी दिले.५ वर्षांची कालमर्यादा संपलेले सर्व नोकरीविषयक प्रस्ताव बोर्ड मंजुरीकरीता महिनाभरात पाठविण्यात येतील, तसेच बल्लारपूर क्षेत्रातील गोवरी सेंट्रल परियोजनेच्या प्रकल्प अहवालास (पीआर) मंजुरी देवून खरेदीदार निश्चित करीत सेक्शन – ४ करीता सादर करण्यात येईल, अशी माहिती या सुनावणीत मुख्यालय प्रबंधनाकडून देण्यात आली. माजरी क्षेत्रातील नागलोन युजी टु ओसी विस्तारीकरण योजनेतील प्रकल्पग्रस्तांशी ओलिताच्या दरासाठी करारनाम्याकरीता स्थळ पंचनामे करण्याचे तसेच वणी क्षेत्रातील मुंगोली विस्तारीकरण योजनेअंतर्गत आपसी समझौताधारक शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला व नोकरी करीता वेकोलि प्रबंधन, जिल्हाप्रशासन व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या सयुक्त बैठकीत निर्णय घेण्याचे तसेच तुकडेबंदी कायद्याच्या अवहेलनेमुळे प्रलंबित नोकरी प्रस्तावांचा विषय आणि लक्ष्मीमुक्ती जी.आर अंतर्गत झालेल्या जमिनीचे फेरफार याबाबत सुध्दा संयुक्त बैठकीत निर्णय घेण्याचे निर्देशही हंसराज अहीर यांनी यावेळी दिले.तांत्रिक करणास्तव प्रलंबित असलेल्या व्यक्तीगत नोकरी प्रस्तावावरही या सुनावणीत चर्चा होवून हे प्रस्ताव विलंब न लावता मार्गी काढण्याच्या सुचना देण्यात आल्या. या जनसुनावणीत अनेक महत्वपुर्ण विषयावर व व्यक्तिगत प्रलंबित प्रश्नांवर चर्चा होवून सकारात्मक निर्णय घेण्यात आले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .